# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
## कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर



Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

११ फेब्रुवारी, २०१९

☎ : 07172-264300

: 07172-255800

✍: 7276494810 (PRO)


## चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक १०/०२/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **चंद्रपुर शहर, रामनगर, दुर्गापुर, बल्लारशाह, वरोरा, शेंगाव, माजरी, ब्रम्हपुरी, नागभिड, तळोधी, सावली, सिंदेवाही, पाटण, राजुरा** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **१९** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन ०४ आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयात एकुण **१,३४,७००/—रू.** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

———————————————————————————————

## चंद्रपर पोलीसांची जुगार खेळणाऱ्यांवर कार्यवाही

**१)पोलीस स्टेशन पोंभुर्णा :—**

दिनांक ०७/०२/२०१९ रोजी पोलीस स्टेशन **पोंभुर्णा** अंतर्गत चिंतलधाबा येथे आरोपी हा कोंबडयाच्या झुंजीवर जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **पोंभुर्णा** येथे अप. क्र. ५५/२०१९ कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयात घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **१,४००/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **पोंभुर्णा** पोलीस करीत आहे.

———————————————————————————————